ARTHA Poona 4.

अर्थशास्त्र, व्यापार, उद्योगधंदे, बँकिंग, सहकार, इत्यादि विषयांस वाहिलेलें एकमेव मराठी साप्ताहिक
स्थापना : १९३५

# अर्थ

" अर्थ एव प्रधानः" इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति ।
—कौटिलीय अर्थशास्त्र

प्रत्येक बुधवारीं प्रसिद्ध होतें.
वर्गणीचे दर :
वार्षिक : ६ रु.
सहामाही : ३ रु.
किरकोळ : २ आ.
दुर्गाधिवास, पुणें ४.

LICENCED TO POST WITHOUT PREPAYMENT
Reg. No. B. 3434. Licence No. 53.

वर्ष १० | पुणें, बुधवार तारीख २९ सप्टेंबर, १९५४ | अंक ३८

## विविध माहिती

**जागतिक बँकेकडून कर्ज**—ट्रॉमबे येथील विजेच्या कारखान्याला कर्ज देण्याचा विचार करण्याचें आश्वासन जागतिक बँकेनें दिलें आहे असें समजतें. हा कारखाना टाटा कंपनी बांधणार आहे. कर्जाच्या अटी ठरल्या असून बँकेच्या तज्ज्ञांनीं योग्य तें कर्ज देण्याची शिफारसहि केली आहे. कोयना-धरणाचा मात्र अधिक विचार होणें आवश्यक असल्याचें बँकेचें मत आहे.

**मद्रास राज्यांतील भूदान**—तंजावर येथील एका बड्या जमीनदारानें भूदानयज्ञासाठीं आपली ६० एकर जमीन दान केली. ह्या जमिनीची वांटणी मद्रास राज्याचे मुख्य प्रधान श्री. नाडर ह्यांनीं नुकतीच केली. ६० शेतकरी कुटुंबांना प्रत्येकी १ एकर जमीन देण्यांत आली. बहुतेक शेतकरी हरिजन आहेत.

**नव्या रेल्वे-रस्त्याची मागणी**—हैद्राबाद राज्यांतील रायचूर पासून रत्नागिरी जिल्ह्यांतील फोंडा ह्या गांवापर्यंत रेल्वे-रस्ता बांधण्यांत यावा अशी मागणी करण्यांत आली आहे. हा रस्ता रायचूर-बागलकोट-जमखिंडी-निपाणी असा असावा आणि तो दुसऱ्या पंचवार्षिक योजनेंत समाविष्ट करण्यांत यावा असा आग्रह धरण्यांत येत आहे. लांबी २५० मैल होईल.

**अणुशस्त्राचा स्फोट**—अणुशस्त्राच्या स्फोटाचे परिणाम अजमावण्यासाठीं रशिआंत आणखी एका अणुशस्त्राचा स्फोट नुकताच घडवून आणण्यांत आला. अणुशस्त्राचा हल्ला झाल्यास त्यापासून संरक्षण करण्यासाठीं उपयुक्त अशी माहिती मिळाली असें रशिअन शास्त्रज्ञांचें म्हणणें आहे. रशिआंत घडवून आणण्यांत आलेला हा सहावा अणु-स्फोट आहे.

**उत्तर-प्रदेशांतील बेकारी**—उत्तर-प्रदेशांतील बेकारीला आळा घालण्यासाठीं राज्य सरकारनें कांहीं योजना तयार केल्या आहेत. येत्या सात वर्षांत ह्या योजनांवर सरकार ६२ कोटी रुपये खर्च करणार आहे असें समजतें.

**काश्मीरमध्यें पुन्हां सहशिक्षण**—गेल्या वर्षीपासून काश्मीरमधील शाळांतून व कॉलेजांतून सहशिक्षण रद्द करण्यांत आलें होतें. परंतु आतां पुन्हां सहशिक्षणाला सुरवात करण्यांत येणार असल्याचें समजतें. बहुतेक शाळांतून व कॉलेजांतून शास्त्रीय विषयांच्या प्रयोगशाळांची सोय बेताचीच असल्यानें पहिला निर्णय बदलावा लागला.

**फ्रेंच व जर्मन शिकविण्याची सोय**—मध्य-भारतामधील कॉलेजांतून फ्रेंच व जर्मन ह्या दोन भाषा शिकविण्याची सोय करण्याचा विचार मध्य-भारत सरकार करीत आहे. ह्या भाषा शिकविण्याची सोय झाली तर उच्च शिक्षणासाठीं परदेशीं जाऊं इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांच्या मार्गांतील अडचण नाहींशी, होईल असें सरकारला वाटत आहे.

**बांगड्यांवरील कर उठविण्याची मागणी**—जोधपूरमधील एका सामाजिक कार्यकर्तीनें जोधपूर म्युनिसिपालिटीकडे अशी मागणी केली आहे कीं, म्युनिसिपालिटीतर्फे कांचेच्या बांगड्यांवर घेण्यांत येणारा ऑक्ट्राय कर रद्द करण्यांत यावा. मारवाडांत प्रत्येक विवाहित स्त्री कांचेच्या बांगड्या वापरते. मुसलमान स्त्रियाहि ह्याला अपवाद नाहींत.

**क्षयावरील उत्कृष्ट चित्रपट**—भावनगर येथील डॉक्टर मंडळींना क्षयावरील एक उत्कृष्ट चित्रपट नुकताच दाखविण्यांत आला. हा चित्रपट बर्न येथील क्षयाच्या प्रख्यात इस्पितळाच्या साह्यानें तेथेंच तयार करण्यांत आला असून त्याला दोन पारितोषिकें मिळालीं आहेत. डॉक्टर लोकांना चित्रपट फारच आवडला असें समजतें.

**पूरपीडित मुलांसाठीं दुधाची भुकटी**—अमेरिकन फ्रेन्डस् सर्व्हिसेस कमिटी ह्या संस्थेनें भारतामधील पुरामुळें गांजलेल्या मुलांसाठीं १२० टन दुधाची भुकटी दिली आहे. 'एक्सेलसिआर' ह्या बोटीनें वरील माल नुकताच मुंबई बंदरांत उतरला. त्याशिवाय २२० टन दुधाची भुकटी संयुक्त-राष्ट्र-संघटनेच्या चिल्ड्रेन्स इमर्जन्सी फंडामार्फतहि मिळाली आहे.

**अहमदाबाद म्यु. कॉर्पोरेशनच्या योजना**—अहमदाबाद शहराच्या विकासासाठीं पंचवार्षिक योजनेंत सामील करण्यासाठीं म्हणून अहमदाबादच्या कॉर्पोरेशननें आपल्या योजना नक्की केल्या आहेत. ह्या योजनांत एक स्टेडिअम बांधण्याची असून दुसरी रस्ते बांधण्याची आहे. पहिल्या योजनेस ३ लाख रुपये खर्च येणार असून दुसरीस १·४२ कोटी रुपये खर्च येणार आहे.

**कल्चर्ड मोत्यांच्या जनकाचा मृत्यु**—कल्चर्ड मोत्यांच्या उत्पादनांत कोट्यावधि पौंड मिळविणारे मि. मिकिमाटो हे आपल्या वयाच्या ९६ वर्षी निधन पावल्याचें समजतें. त्यांनीं ह्या धंद्यांत ८ कोटी पौंड मिळविले. जगांतील प्रत्येक स्त्रीच्या गळ्यांत कल्चर्ड मोत्यांचा कंठा दिसला पाहिजे अशी त्यांची महत्त्वाकांक्षा होती. त्यांनीं प्रयोग करून निरनिराळ्या प्रकारचे ९ मोतीं तयार केले होते.

**चार्ली चॅपलिन भारतांत येणार**—भारतामधील सिने-कलावंतांचें एक प्रतिनिधिमंडळ रशिआला गेलें आहे. प्रतिनिधी-मंडळानें जिनीव्हा येथें सुप्रसिद्ध नट चार्ली चॅपलिन ह्यांची भेट घेतली. त्यावेळीं आपण पुढील नऊ महिन्यांत भारताला मुद्दाम भेट देणार असल्याचें त्यांनीं सांगितलें. भारताला भेट देण्याची आपली इच्छा फार पूर्वीपासूनची आहे, असेंहि ते म्हणाले.

## बँक-अवार्डबाबत नवी चौकशी

अॅपेलेट ट्रायब्यूनलचा निवाडा सरकारनें दुरुस्त केला, त्या दुरुस्तीसह तो निवाडा अंमलांत असावा, का अॅपेलेट ट्रायब्यूनल निवाडा जसाच्या तसा अंमलांत आणावा, का त्यांत दुसऱ्या कांहीं दुरुस्त्या कराव्या, ह्याबाबत सूचना करण्याचें काम न्या. राजाध्यक्ष ह्यांचेकडे सोंपविण्यांत आलें आहे.

### चौकशीचे विषय

(१) ऑगस्ट १९५४ पूर्वी बँक-कामगारांना मिळणाऱ्या पगाराबाबत चौकशी करणें आणि (अ) दुरुस्ती केलेल्या अॅपेलेट ट्रायब्यूनलचा निर्णय आणि

(आ) २४ ऑगस्ट १९५४ ची सरकारी आज्ञा क्र. एस. आर. ओ. २७३२ अन्वयें दुरुस्त केलेला अॅपेलेट ट्रायब्यूनलचा निर्णय यांचे त्यांवर झालेले परिणाम समजून घेणें.

(२) (अ) अॅपेलेट ट्रायब्यूनलच्या निर्णयामुळें, निरनिराळ्या बँकांचे बाबतींत स्थगित सेन निवाड्यामुळें येणाऱ्या खर्चांत, किती जादा ओझें पडलें असतें.

(आ) सरकारनें केलेल्या दुरुस्तीमुळें त्यांना किती प्रमाणांत साहाय्य झालें.

(इ) स्थगित सेन निवाड्यानुसार बँकांना येणारा खर्च आणि शास्त्री-निवाड्यानुसार त्यांना आला असता तो खर्च यापेक्षा दुरुस्त निवाड्यानुसार आतां बँकांना किती जादा खर्च लागेल, या गोष्टी जाणून घेणें.

(३) यापूर्वीच संकलित केलेल्या माहितीची छाननी करणें आणि या प्रश्नांच्या चौकशीशीं सुसंबद्ध अशी आणखी माहिती गोळा करणें.

(४) जाणून घेतलेल्या सत्य गोष्टी आणि निरनिराळ्या वर्गांतील बँका आणि इतर एकेकट्या बँका यांच्या पगार देण्याच्या कुवतीशीं सुसंगत अशा प्रकारें बँक-कामगारांना वागवणूक मिळेल हें पाहण्याची गरज या गोष्टी लक्षांत घेऊन,

(अ) दुरुस्त केलेल्या स्वरूपांत अॅपेलेट ट्रायब्यूनलचा निर्णय चालू ठेवावा किंवा कसें.

(आ) अॅपेलेट ट्रायब्यूनलचा निर्णय अंमलांत आणावा काय आणि आणावयाचा असल्यास तो संपूर्णतया किंवा अंशतः आणावा.

(इ) किंवा, आवश्यक वाटतील त्या इतर दुरुस्त्या करून अॅपेलेट ट्रायब्यूनलचा निर्णय अंमलांत आणावा काय, याबाबत शिफारस करणें.

या गोष्टींचा विचार करतांना, बँका किंवा त्यांच्या शाखा फार मोठ्या प्रमाणांत बंद न पडतील हें पाहण्याची इष्टता, एकंदरींत सर्व देशांत आणि विशेषत्वें ग्रामीण भागांत बँकव्यवहारांचा विकास होण्याची गरज आणि बँकांच्या खर्चांत काटकसर करण्याची शक्यता या गोष्टींचाहि योग्य तो विचार करण्यांत यावा.

(५) 'ब' विभागीय राज्यांतील आणि दिल्ली, अजमीर व कूर्ग सोडून इतर 'क' विभागीय राज्यांतील वर्ग ४ च्या विभागांत बँकिंगच्या सोयींचा विस्तार करण्यास उत्तेजन देण्यासाठी जर कांहीं खास दुरुस्त्या आवश्यक असतील तर त्याबाबत विचार करून त्यांची शिफारस करणें.


# भोर स्टेट बँक लि.

[ स्थापना : १९४४ ]

**मुख्य कचेरी:-भोर, जि. पुणें.**

शाखा:-पुणें, पाली व शिरवळ.

| | |
|---|---|
| अधिकृत भांडवल | रु. ५,००,००० |
| खपलेलें भांडवल | रु. ५,००,००० |
| वसूल भांडवल | रु. २,५०,००० |
| गंगाजळी व इतर फंडस् | रु. ७१,६०० |

**बोर्ड ऑफ डायरेक्टर्स**

श्री. म. व्यं. शिंगरे, अध्यक्ष. — न. भू. ना. पां. थोपटे, उपाध्यक्ष.

रावसाहेब य. द. खोले. — श्री. चं. रा. राठी.

श्री. के. वि. केळकर, एम्. ए., एलएल्. बी. — श्री. बा. ग. धंडुके.

सरकारी रोखे खरेदी-विक्री, व्याजवसुली, पेन्शन कलेक्शन व इतर बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात.

बँक १ ते ४ वर्षे मुदतीसाठी कायम ठेवी स्वीकारते.

दराबाबत समक्ष चौकशी करावी.

पुणें कचेरी:-बुधवार घ. नं. ३६१-६२, पासोड्या विठोबानजीक. फोन नं. २५७६.

अधिक माहितीसाठी लिहा.

वाय. एस. जोशी, अ. मॅनेजर. — एन्. व्ही. पांडव, मॅनेजर

म्यूच्युअल कंपन्यांत सर्वांत अधिक बोनस वाटणारी महाराष्ट्रांतील अग्रेसर विमा कंपनी !!

# दि सेन्ट्रल म्यूच्युअल लाईफ इन्शुरअरन्स कं. लि.

हयातींतील विम्यास : दरसाल दर हजारीं रु. ७

हयातीनंतरच्या विम्यास: ,, ,, ,, रु. ९

ठिकठिकाणीं प्रतिनिधी नेमणें आहेत.

६७ अपोलो स्ट्रीट फोर्ट, मुंबई — शं. न. आगाशे, मॅनेजिंग डायरेक्टर

# दि व्हल्कन इन्शुअरन्स कं. लि.

—पुणें शाखा—

**१७९, कर्वे बिल्डिंग, लक्ष्मी रोड.**

आग, मोटार, अपघात व वर्कमेन्स कॉंपेन्सेशन ह्यांचे विमे स्वीकारणारी प्रमुख स्वदेशी कंपनी.

एजन्सी व इतर माहितीसाठीं चौकशी करा :

ब्रँच सेक्रेटरी.

# अर्थ

बुधवार, ता. १९ सप्टेंबर, १९५४





संस्थापक :
प्रो. वामन गोविंद काळे

संपादक :
श्रीपाद वामन काळे


## बँकांना लायसेन्स देण्यास एवढा विलंब का ?

रिझर्व्ह बँकेनें आतांपर्यंत बँकिंग कंपन्यांच्या कायद्याखालीं ३३ शेडयूल्ड बँकांना व एका विदेशी बँकेला लायसेन्स दिला आहे. ह्या विदेशी बँकेनें अद्याप व्यवहारास प्रारंभ केलेला नाहीं. १४ बँकांना लायसेन्स नाकारण्यांत आला. ५७ शेडयूल्ड व ४४७ बिगर–शेडयूल्ड बँकांना अद्याप लायसेन्स दिलेला नाहीं. 'ब' वर्गीय राज्यांतील बँकांचे लायसेन्ससाठी अर्ज आले, त्याला अडीच वर्षें लोटलीं व इतर ठिकाणच्या बँकांनीं लायसेन्ससाठी अर्ज केले, त्याला साडेपांच वर्षें होऊन गेलीं. अर्जदार बँकेनें बँकिंग कंपन्यांच्या कायद्यानें घालून दिलेल्या अटी पाळल्या आहेत किंवा नाहींत, ह्याची तपासणी केल्यावरच लायसेन्स दिला जातो. सुमारें ६० बिगर–शेडयूल्ड बँका सोडल्या, तर बाकीच्या सर्व बँकांची एकदा तपासणी पुरी झालेली आहे. बँकिंग कंपन्यांच्या कायद्याची अंमलबजावणी सुरू झाल्यापासून तीन वर्षांचे आंत, कायदा अंमलांत येण्याचे वेळीं अस्तित्वांत असलेल्या बँकेला लायसेन्स नाकारतां येणार नाहीं, असें कायद्याचें एक कलम आहे. म्हणून, लायक बँकांनाहि लायसेन्स देण्याचें काम १९५२ पासूनच सुरू करण्यांत आलें. कांहीं बँकांचे बाबतींत कांहीं दोष आढळले, ते दुरुस्त करण्याची त्यांना संधि देण्यांत आली; म्हणून लायसेन्स देणें किंवा न देणें ह्याचा निर्णय तहकूब ठेवण्यांत आला. १९५२ पासूनच लायसेन्स बाबतींत रिझर्व्ह बँकेनें खऱ्या कामास प्रारंभ केलेला आहे आणि कायद्यांतील अटी पुऱ्या होईपर्यंत लायसेन्स देतां येत नाहीं म्हणून उशीर होत आहे. घाई करण्याजोगी ही बाब नाहीं; कारण लायसेन्सबाबत रिझर्व्ह बँकेनें तांतडीनें निर्णय केला तर कित्येक बँका बंद होतील. म्हणून, त्यांना सुधारण्यासाठी शक्य तेवढा अवधि देण्याचें रिझर्व्ह बँकेचें धोरण योग्य असेंच आहे.

## राष्ट्रीय नियोजन कर्जाचा अनुभव

राष्ट्रीय नियोजन कर्जांत १६ सप्टेंबर अखेर, कर्जरोख्यांची विक्री बंद होईपर्यंत, १५० कोटी रुपयांच्यावर रक्कम जमा झाली, ही समाधानकारक गोष्ट मानली पाहिजे. १९ एप्रिल रोजीं कर्ज जाहीर झालें. कर्जाच्या पहिल्या दोन आठवड्यांत ४५·५ कोटी रुपये जमले; सबंद मे महिन्यांत ३५·५ कोटी रुपयांच्या रोख्यांची विक्री झाली; जूनमध्यें २४·५५ कोटी रु. जमा झाले व जुलैमध्यें २० कोटी रु. आले. म्हणजे, जुलै १९५४ अखेर १२५ कोटी रुपयांचे रोखे खपले व पुढील दीड महिन्यांत आणखी २५ कोटी रुपयांचे रोखे विकले गेले. पहिल्या दोन महिन्यांत कर्जरोख्यांस चांगली मागणी आली ती पुढें मंदावली व राष्ट्रीय नियोजन कर्जाचा विषय बाजूला पडूं लागला. शेवटीं, कर्ज बंद होण्याची तारीख जाहीर झाल्यानंतर कर्जाला पुनः मागणी येऊं लागली. सरकारी कर्जाची विक्री ५ महिने इतकी दीर्घकाल चालू ठेवण्याचा हा पहिलाच प्रसंग आहे आणि त्या दृष्टीनें प्रस्तुत कर्जाबाबत आलेला अनुभव जमेस धरून ह्यानंतरच्या कर्जाची व्यवस्था करावी लागेल. कर्जरोख्यांच्या विक्रीसाठी अधिक प्रभावी प्रचार केला, तर चार–सहा आठवड्यांची मुदत पुरी पडावी, असें मत व्यक्त करण्यांत येत आहे. दुसरी एक महत्त्वाची बाब म्हणजे, कर्जरोखे खरीदणारांना त्यांचे रोखे मिळण्यास वेळ लागतो, ही होय. पब्लिक डेट ऑफिस (रिझर्व्ह बँकेचेंच एक खातें) कडे सरकारी रोख्यांबाबत सर्व काम सोंपवलेलें असतें. ज्यांनीं कर्ज काढून सरकारी रोखे घेतलेले असतात किंवा घेतलेल्या रोख्यांचे तारणावर ज्यांना कर्ज उभारावयाचें असतें, त्यांची, हातांत बाँड सत्वर न आल्यानें कुचंबणा होते. ज्यांनीं बँकेमार्फत सरकारी कर्जरोखे घेतले असतील त्यांची गोष्ट वेगळी; पण इतरांना बँकेकडून कर्ज काढतेवेळीं हातांत रोख्यांचे कागद असणें आवश्यकच असतें. पण हे रोखे हातांत येण्यास वेळ लागला, म्हणजे त्यांची कर्ज उभारण्याची शक्ति गोठून बसते. बँका सरकारी रोख्यांच्या तारणावर ९०% पर्यंत कर्जें देऊं शकतात, ह्यावरून किती लहान व मध्यम आकाराचीं कर्जें रोख्यांचे अभावीं अडकून पडलीं असतील, ह्याची कल्पना येईल. ह्यापुढें मोठालीं कर्जें सरकार वरचेवर उभारील, पण त्यांची व्यवस्था कार्यक्षम व्हावी ह्याची आगाऊ तरतूद करण्यांत आली पाहिजे व त्यासाठीं पब्लिक डेट ऑफिसच्या कार्यपद्धतींत शक्य ती सुधारणा घडवून आणावयास पाहिजे.

## भारतामधील साबणाच्या धंद्याचें भवितव्य

म्हैसूर राज्याचे मुख्य मंत्री श्री. हनुमंतया ह्यांनीं भारतामधील साबणाच्या धंद्याच्या भवितव्याबद्दल चिंता व्यक्त करणारें भाषण नुकतेंच केलें. श्री. हनुमंतया म्हणाले कीं, साबण तयार करण्यासाठीं लागणाऱ्या तेलाचे भाव एकसारखे कमी–जास्त होत असतात. तेलाच्या भावांतील चढ–उताराचें मुख्य कारण म्हणजे तेजी–मंदीवाल्यांचे सट्ट्याचे व्यवहार. साबणाच्या धंद्यापुढील हा प्रश्न सर्वांत अधिक महत्त्वाचा असून तो सोडविण्यासाठी सरकार आणि उद्योगपती ह्यांनीं एकत्र आलें पाहिजे. साबणाच्या धंद्याला मदत करण्यासाठी सरकारला दोन गोष्टी करतां येण्यासारख्या आहेत. साबणाला परकीय बाजारपेठा मिळवून देण्यासाठी सरकारनें साह्य करावें आणि ह्या धंद्यांत जे उपपदार्थ निर्माण होतात त्यांचा उपयोग करून घेण्यासाठींहि सरकारनें योजना आखावी. सरकारप्रमाणेंच उद्योगपतींनाहि कांहीं गोष्टी करतां येण्यासारख्या आहेत. भारतांत अजूनहि साबणाची बाजारपेठ वाढवितां येण्यासारखी आहे. परंतु, त्यासाठी देशांतील लोकांना साबण वापरण्याची आवश्यकता अधिक प्रमाणांत पटवून दिली पाहिजे. त्याच बरोबर, साबणाच्या किंमती आणि त्याचा दर्जा ह्याबाबतींत अधिक एकसूत्रताहि अमलांत आणणें आवश्यक आहे. साबणाचा खप वाढविण्यासाठीं प्रचाराची मोहीमहि करणें जरूर आहे. इंडियन सोप अँड टॉयलेट मेकर्स असोसिएशनची २० वी परिषद् बंगलोर येथें गेल्या २१ तारखेस झाली. त्याप्रसंगीं असोसिएशनचे अध्यक्ष श्री. बदामी ह्यांनींहि धंद्यासंबंधीं उपयुक्त विचार प्रकट केले.

## चीनला रशिआची मदत

चीनचें औद्योगीकरण करण्यासाठी रशिआ चीनला गेलीं चार-पांच वर्षे मदत करीत आहे. ह्या मदतीचा तपशील फारसा बाहेर आलेला नाहीं. रशिया चीनला दरवर्षी ६ कोटी पौंडांचें कर्ज देत आहे आणि चीनच्या बऱ्याच नव्या कारखान्यांना यंत्रसामुग्री पुरवीत आहे. रशिआच्या पंचवार्षिक योजनांचें एक स्वतंत्र मुखपत्र आहे. ह्या पत्रांत चीनला देण्यांत येणाऱ्या मदतीची थोडीबहुत कल्पना देण्यांत आली आहे. त्यावरून असें दिसतें कीं, ह्या मदतीचें प्रमाण बरेंच मोठें असावें. तथापि ही मदत कोणत्या अटीवर आणि प्रत्यक्ष किती देण्यांत येत आहे ह्याबद्दल वरील मुखपत्रांत मुग्धताच पाळण्यांत आलेली आहे. १९५९ साल अखेर चीननें आपल्या उत्पादनांत पुढीलप्रमाणें वाढ करण्याचें ठरविलें आहे. पोलाद ४४,००,००० टन; बिडाचें लोखंड २,५०,००,००० टन; वीज ६,७५,००,००,००० किलोवॅट तास. वरील उत्पादन वाढविण्यासाठीं जें यंत्रसाहित्य लागेल तें रशिआ पुरविणार आहे ह्याच, म्हणजे १९५९ अखेरच्या, काळांतील भारताच्या पोलादाच्या निर्मितीपेक्षा चीनचें संकल्पित उत्पादन थोडेंसें अधिक असेल. पण जपानपेक्षा तें कमीच असेल. १९५९ अखेर जपान ७०,००,००० टन पोलाद निर्माण करूं लागेल. १९५९ सालअखेर ठरविल्याप्रमाणें उत्पादन वाढलें तर चीनचें पोलादाचें उत्पादन १९५२ च्या ३०० टक्के अधिक असेल; बिडाच्या लोखंडाचें १६० टक्के अधिक असेल आणि विजेचें उत्पादन २०० टक्के अधिक असेल. गेल्या जूनमध्यें रशिआंतील 'प्रावदा' ह्या पत्रानें चीनच्या औद्योगिक उत्पानाबद्दल कांहीं अंदाज प्रसिद्ध केले होते. त्यावरून असें दिसतें कीं, चीनचा सध्यांचा कार्यक्रम पुरा झाला म्हणजे चीनचें उत्पादन रशिआच्या १९३१ सालच्या औद्योगिक उत्पादनाच्या पातळीवर येईल.

---

## मुंबई राज्यांतील सहकारी चळवळ

१९५४ च्या दुसऱ्या तिमाहींत मुंबई राज्यांतील सहकारी चळवळीनें चांगली प्रगति केल्याचें दिसतें. ह्या काळांत राज्यांत निरनिराळ्या प्रकारच्या ४३४ सहकारी संस्थांची नोंदणी करण्यांत आली. प्रस्तुत तिमाहीअखेर मुंबई राज्यांत शेतीविषयक सहकारी पतपेढ्यांची एकूण संख्या १०,५५९ होती. ह्या संख्येंत विविध उपयोगी सहकारी संस्था व धान्य बँका ह्यांचाहि समावेश करण्यांत आला आहे. नवीन नोंदण्यांत आलेल्या सहकारी संस्थांची जिल्हावार वांटणी पुढीलप्रमाणें आहे. अहमदाबाद जिल्हा २२; अमरेली ११; मेहसाणा २१; बनासकांठा ७; खेडा १४; साबरकंठा १२; बडोदा १८; भडोच १४; पंचमहाल २४; सुरत ७; पू. खानदेश २२; प. खानदेश १६; नाशिक २१; मुंबई ७; मुंबईंतील उपनगरें १; ठाणें ४०; पुणें ६; अहमदनगर २३, उत्तर सातारा ७; द. सातारा ६; सोलापूर १८; कुलाबा १२; रत्नागिरी ५; कोल्हापूर २३; विजापूर ३०; बेळगांव २१ उ. कॅनरा ४ आणि धारवाड १२.

---

## मॅलेन्कॉव्हकडे अमेरिकेंतून विमानानें १७ फुलें रवाना

कॅलिफोर्निया स्टेट फ्लोरिस्टस असोसिएशनची वार्षिक सभा १३ सप्टेंबर रोजीं झाली. सभेनंतर तात्काळ, कॅलिफोर्निया जातीचीं पांढरीं गुलाबाचीं १७ फुलें विमानानें रशियाचे पंतप्रधान मॅलेन्कॉव्ह ह्यांचेकडे पाठविण्यांत आलीं. पंतप्रधान व त्यांचे १६ प्रमुख सहकारी ह्यांच्याकरितां तीं फुलें होतीं. पाश्चात्य जगाची शांततेसाठी तळमळ व्यक्त करण्याचा त्यांत हेतु होता.

## आगामी बँकर्स परिषद्

पुणें येथें दि. २ व ३ रोजीं महाराष्ट्रांतील बँकर्सची परिषद् भरणार आहे, तिचें उद्घाटन श्री. भाऊसाहेब हिरे, महसूल मंत्री हे करणार आहेत. परिषदेचें अध्यक्षस्थान श्री. वा. पुं. वर्दे हे स्वीकारतील. परिषदेंत चर्चिल्या जाणाऱ्या प्रश्नांवरून, महाराष्ट्रांतील बँकर्सची ही परिषद् अत्यंत उपकारक व मार्गदर्शक ठरेल असा विश्वास वाटतो. श्री. वर्दे ह्यांच्या मार्गदर्शनाचा फायदा बँकर्सना मिळणार आहे, ही अत्यंत स्वागतार्ह अशी गोष्ट आहे. महाराष्ट्रांतील ठिकठिकाणचे बँकर्स केवळ सभेंतच नव्हे, तर अनौपचारिक रीत्याहि दोन दिवस त्यांच्यापुढील विविध प्रश्नांची मोकळ्या मनानें चर्चा करूं शकतील व परस्पर-परिचयाची संधि त्यांना मिळून त्यांचेमधील संबंध अधिक दृढ स्नेहाचे व सहकार्याचे होतील, अशी अपेक्षा आहे. ह्या दृष्टीनेंच कार्यक्रमाची आखणी करण्यांत आली असून त्यांत भोजन, चहापान, सिनेमा, सहली, अनौपचारिक गप्पागोष्टी, इत्यादींचा समावेश करण्यांत आलेला आहे. महाराष्ट्रांतील ठिकठिकाणच्या बँकांचे संचालक व अधिकारी परिषदेस मोठ्या संख्येनें उपस्थित राहून तिच्या यशास हातभार लावतील, अशी आशा आहे. परिषदेचा कार्यक्रम खालीलप्रमाणें आहे:—

### कार्यक्रम

**शनिवार, २ ऑक्टो सकाळीं.** १० ते ११–३५. अध्यक्ष, श्री. के. पी. जोशी ह्यांचें स्वागतपर भाषण, अहवाल वाचन, संदेश वाचन, श्री. हिरे ह्यांचें भाषण, श्री. वर्दे ह्यांचें भाषण. दुपारीं २–३० ते ४–३० आणि ५ ते ७ चर्चा. ७ ते ७–३० बँकिंग-विषयक चित्रपट.

**रविवार, ३ ऑक्टो. सकाळीं** ८–३० ते १०–३० चर्चा व ठराव. ११ ते १२ चर्चा व ठराव. दुपारीं १२–३० ते १–३० निमंत्रितांना महाराष्ट्र बँक इमारतींत जेवण. ३ ते ७ पुणें विद्यापीठ, नॅशनल केमिकल लॅबोरेटरी, खडकवासला, येथें सहल. ८–४५ ते ९ पुणें रेडिओवर परिषदेचें समालोचन.

### महाराष्ट्रांतील बँकिंग

परिषदेचे मुख्य पाहुणे, श्री. हिरे, ह्यांच्या हस्तें "महाराष्ट्रांतील बँकिंग" ह्या पुस्तकाचें प्रकाशन होणार आहे. प्रस्तुत पुस्तकांत, १९५२ अखेरच्या आकड्यांवरून, महाराष्ट्रांतील बँकिंग व बँका ह्यासंबंधीं चर्चा करण्यांत आली आहे, ती हितसंबंधीयांस उद्बोधक वाटेल. जॉइंट स्टॉक व सहकारी, दोन्ही बँकिंगचा परामर्ष पुस्तकांत घेण्यांत आला आहे व तुलनेसाठीं अखिल भारतीय आंकडेहि दिले आहेत.

---

## मिरज स्टेट बँकेचा रौप्यमहोत्सव

दि मिरज स्टेट बँकेचा रौप्यमहोत्सव बुधवार, दि. २२ रोजीं रिझर्व्ह बँकेचे एक्झिक्यूटिव्ह डायरेक्टर, श्री. जे. व्ही. जोशी, ह्यांच्या हस्तें साजरा करण्यांत आला. मिरज स्टेट बँकेची स्थापना १९२९ सालीं झालेली असून ती शेड्यूल्ड बँक आहे.

---

## ३८ शस्त्रक्रियांनंतर पुनः दोन्ही पाय तोडून घेण्यास नकार!

१९४६ मधील एका विमानअपघातांत फिट्झगेराल्डची कणा वगळून बाकी सर्व हाडें मोडलीं. त्यावर गेल्या वर्षअखेर ३८ शस्त्रक्रिया करण्यांत आल्या. त्याचे दोन्ही पाय कापावे लागतील आणि आणखी कित्येक शस्त्रक्रिया आवश्यक होतील, असें त्यास कांहीं दिवसांपूर्वी सांगण्यांत आलें. तेव्हां त्यानें आपल्या विम्हार्डी ( लंडन येथें ) गोळ्या खाऊन आत्महत्या केली.

## मेटल इंडस्ट्रीज हँडबुक अँड डायरेक्टरी १९५४, वर्ष ४३ वें

ग्रंथ-प्रकाशक – लुई कॅसिअस कंपनि., डॉरसेट हाउस, स्टॅम्फर्ड स्ट्रीट, लंडन, एस. ई. १. पृष्ठसंख्या – ४७२. या ग्रंथाचे विभाग चार करण्यांत आलेले आहेत. पहिल्या विभागांत खनिज धातूंचे गुणधर्म दिले आहेत. ते सर्व अगदीं अद्ययावत असून अगदीं अर्वाचीन शास्त्रीय पद्धतीनें दिलेले आहेत. इतके गुणधर्म समजल्यानंतर या धातूसंबंधीं सर्व कांहीं समजून येईल. केवळ अॅल्युमिनियम् या विषयावर सर्व प्रकारें संशोधन शास्त्रीय व उत्पादनविषयक ऊहापोह करणारी एक संस्था लंडन येथें आहे. बहुतेक सर्व धातूंचीं संपूर्ण वर्णनें व गुणधर्म व मूलभूत द्रव्यांचे गुणधर्म या ग्रंथांत शास्त्रशुद्ध पद्धतीनें दिलेले आहेत. ही माहिती प्रत्यक्षपणें उद्योगधंद्यांना उपयोगी पडणारी असल्या-कारणानें फार महत्त्वाची आहे.

दुसऱ्या भागांत धातूंची पाहणी व आंकडेवार माहिती आणि तिचें उत्पादन याबद्दल सविस्तर माहिती व देशवार उत्पादन-विषयक परिस्थिति दर्शविलेली आहे. त्यावरून जगांतील उत्पन्न किती व जगाची गरज किती हें समजून येतें.

सोनें :–या उंची धातूचे देशवार आंकडे उद्बोधक होतील म्हणून ते उद्धृत करीत आहे. १९५२ सालीं ३ कोटी, ४२ लक्ष औंस सोनें अमेरिकेच्या ब्यूरो ऑफ माइन्सचा जगांतील उत्पन्ना-बद्दल अंदाज आहे. तेच १९५१ सालीं ३ कोटी, ३५ लक्ष औंस झाले. आफ्रिका १ कोटी १८ लक्ष औंस. यू. एस्. एस्. आर. ९५ लक्ष औंस. इ.

तसेंच अॅल्युमिनियम् या धातूचें जागतिक उत्पादन १९५२ सालीं २० लक्ष, ५० हजार मेट्रिक टन झालें आहे. अशा प्रकारें प्रत्येक धातूचें उत्पादन किती झालें व उलाढाल किती झाली याची माहिती ग्रंथांत आलेली आहे.

पुढें धातूंचीं नांवें, त्यांचीं वजनें, रंग, गुरुत्व, उष्णताग्रहण इ. इ. कोष्टकें संकलित केलीं आहेत. त्यानंतर धातूंचें संकुचन व प्रसरण यासंबंधींचें सूक्ष्म गणित केलेलें आढळतें. धातु व मूलभूत द्रव्यें यांचें पार्थिव गुणधर्म, उष्णताग्राहकत्व व विद्युत्ग्रहण यांचें शास्त्रीय गुणवर्णन सूक्ष्म गणितानें दाखविलेलें आहे. ही माहिती रसायन-शास्त्राचा अभ्यास करणारांना व प्रत्यक्ष उत्पादनविषयक कारखानदारी करणारांना उपयोगी पडणारी आहे. नंतर मूलभूत तत्त्वें आणि संमिश्र धातू यांची अगणित कोष्टकें व प्रमाणें ग्रंथांत आलेलीं आहेत. पुढें ब्रिटिश स्टँडर्ड स्पेसिफिकेशन्सच्या रूपानें बरीच आधारभूत माहिती ग्रंथांत दिलेली आहे. विमानरचनेमध्यें लागणारी साहित्यें व त्यांचीं वर्णनें व स्वरूपें हा विभाग महत्त्वपूर्ण आहे. त्यानंतर इलेक्ट्रो-प्लेटिंग व त्यांतून निर्माण होणारे उद्योग-धंदे व त्यांचीं साधनें व त्या कामीं येणारीं खनिजें दिलेलीं आहेत.

शेवटच्या, चवथ्या भागांत औद्योगिक संघ, शास्त्रीय संस्था, संशोधन विश्वस्त समित्या आणि एकेका धातूचे एकेक प्रकारचे शास्त्रीयदृष्ट्या उद्योगधंदेविषयक काम, विशिष्ट प्रकारें चालविणारी संघटित समिति व त्यांचें कार्य यासंबंधींची आजकाल व्यापारउदीम व उद्योगधंदा करणारांना दैनंदिन कामांत उपयोगी पडणारी माहिती ग्रंथांत दिली आहे. ती अद्यावत आहे. शेवटीं कोणत्या धातू व त्यांच्यापासून होणाऱ्या संमिश्र धातू कोठून खरेदी करावयास येतील याचें संपूर्ण संदर्भ दिलेले आहेत.

कोणता कच्चा माल कोठून मिळवावा, त्यांचे गुणधर्म व संमिश्रणाचीं प्रमाणें विवक्षित कामासाठी कोणतीं असावींत, कशी शोधावींत, याची माहिती, जिज्ञासूंना सांगत येते. ही या ग्रंथानें प्रत्यक्ष उपयुक्त ज्ञान देऊन दूर केलेली आहे. शास्त्रीय ज्ञान, शास्त्रीय संशोधन, व प्रत्यक्ष कारखानदारांच्या गरजा एकत्रित झालेल्या असून, त्यामुळें ग्रंथाची उपयुक्तता द्विगुणित झाली आहे.

महाराष्ट्र औद्योगिक संग्रहालय, पुणें २, दि. ४-९-१९५४ — मा. वि. धारपुरे, क्युरेटर

---

### कारकुनांत स्त्रियांचें वाढतें प्रमाण

ग्रेटब्रिटनमध्यें कचेऱ्यांतील कारकुनी काम आतां पुरुषांचे ऐवजीं स्त्रियांच्याकडे अधिकाधिक जात चाललें आहे. १९३१ मध्यें एकूण कारकुनांपैकीं ४०% स्त्रिया होत्या; आतां तें प्रमाण ६०% झालें आहे. अंगमेहनत करणाऱ्या पुरुष कामगारापेक्षा पुरुष कारकुनाला दर आठवड्याला १ पौंड कमी मिळकत होते; तर त्या उलट हातानें काम करणाऱ्या स्त्रीकामगारापेक्षा स्त्री-कारकून १० ते १५ शिलिंग ज्यास्त मिळविते. स्त्रिया कारकुनी कामाला अधिक लायक, तर पुरुष मेहनतीच्या कामाला अधिक लायक ठरतात. स्त्री-कारकुनांपैकीं निम्म्यापेक्षा अधिक २४ वर्षांचे पेक्षा कमी वयाच्या आहेत; पण निम्मे पुरुष—कारकून ३५ चे पुढें आहेत. कारकुनांपैकीं कनिष्ठ स्थानीं स्त्रिया असतात व देखरेखीचे कामीं पुरुष असतात. अर्थात्, पुष्कळ स्त्रिया विवाह ठरल्यावर नोकरी सोडतात, त्याचाहि तो परिणाम आहे. पुरुष व स्त्री—कारकुनांच्या पगारांतील विषमता पुरुषांच्या पगाराच्या २६–३१% इतकी आढळली. १९४२ मध्यें ती ३४–३९% होती. कामावर असलेल्या एकूण स्त्री-पुरुषांपैकी १०% कारकुनी करतात व १०% पेक्षा अधिक लंडनमध्यें आहेत. गेल्या शतकांत हें प्रमाण वाढत चाललें आहे.


दि
# बँक ऑफ महाराष्ट्र लि.

शेड्यूल्ड बँक  स्थापना : १९३५

**भांडवल**

वसूल झालेलें भांडवल रु. १६,००,०००

रिझर्व्ह व इतर फंड रु. ७,००,०००

एकूण खेळतें भांडवल रु. ४,००,००,००० चे वर

**बँकेच्या शाखा**

मुंबई (फोर्ट, गिरगांव, दादर), कल्याण, पुणें (डेक्कन जिमखाना व खडकी), नाशिक, चाळिसगांव, धुळें, जळगांव, नागपूर, रत्नागिरी, कोपरगांव, हुबळी, सोलापूर, कोल्हापूर, द. हैद्राबाद, सांगली, अमरावती, ठाणें व हरिहर (म्हैसूर सं.)

मुख्य कचेरी:– बाजीराव रस्ता, पुणें २.

चिं. वि. जोग, मॅनेजर.

## बिगर–शेड्यूल्ड बँकांच्या मार्गांतील अडचणी

( बँकांच्या पुणें येथील आगामी परिषदेमध्यें चर्चेसाठी बिगर-शेड्यूल्ड बँकांच्या अडचणींबाबत एक टाचण बँक ऑफ कराड लि. नें परिषदेकडे विचारासाठीं पाठविलें आहे, त्याचा सारांश येथें दिला आहे. )

बँकांची तपासणी, देखरेख, नियंत्रण, त्याचप्रमाणें ३८ व्या कलमाखाली त्यांना नव्या ठेवी घेण्यास बंदी करणें व बँक गुंडाळण्याबाबत शिफारस करणें, इत्यादींसाठी १९४९ चा बँकिंग कंपन्यांचा कायदा करण्यांत आलेला आहे. ह्या तरतुदी शेड्यूल्ड व बिगर–शेड्यूल्ड, दोन्ही प्रकारच्या बँकांना लागू आहेत. फक्त १८ व्या कलमांत शेड्यूल्ड व बिगर–शेड्यूल्ड ह्यांचा उल्लेख आहे; त्या कलमाप्रमाणें बिगर–शेड्यूल्ड बँकांना दर महिन्यास कॅश रिझर्व्ह बाबत तक्ते पाठवावे लागतात; शेड्यूल्ड बँकांना तसे पाठवावे लागत नाहींत.

१९३४ च्या रिझर्व्ह बँक कायद्यानें शेड्यूल्ड बँकांना कांहीं सवलती दिल्या आहेत, पण त्यांपैकीं एकहि सवलत बिगर–शेड्यूल्ड बँकांच्या वाट्यास आलेली नाहीं. बिगर–शेड्यूल्ड बँकांच्या वाढीचे मार्गांतील कांहीं अडचणी येथें देत आहों:—

( १ ) सरकारी रोख्यांचे तारणावरसुद्धां, रिझर्व्ह बँक बिगर-शेड्यूल्ड बँकांना कर्जे देत नाहीं. शेड्यूल्ड बँकांना रिझर्व्ह बँक कायद्याखालीं कर्ज मिळण्याच्या अनेक सोयी आहेत; त्या हुंड्यांच्या तारणावरहि कर्जे घेऊं शकतात. हीं कर्जे "अनसिक्युअर्ड" समजलेलीं आहेत.

( २ ) जेथें इंपीरिअल बँकेची शाखा आहे, अशा ठिकाणीं पैसे मोफत पाठविण्याची शेड्यूल्ड बँकांना कांहीं अंशीं सोय.

( ३ ) म्युनिसिपालिट्या व लोकलबोर्डें ह्यांचेकडून बिगर-शेड्यूल्ड बँका ठेवी स्वीकारूं शकत नाहींत. अशा ठेवी घेण्यास सहकारी बँकांना मान्यता मिळूं शकते.

( ४ ) १९५० च्या बाँबे पब्लिक ट्रस्टस् कायद्याखाली शेड्यूल्ड बँकांना कांहीं प्रकारच्या रकमा स्वीकारतां येत नाहींत.

( ५ ) शेड्यूल्ड–बिगर–शेड्यूल्डमधील ह्या तफावतीमुळें शेड्यूल्ड बँकांना फक्त शेड्यूल्ड बँकांशींच संबंध ठेवावासा वाटतो व त्या बँकांचा, त्याचप्रमाणें मोठ्या फर्म्सचा धंदा बिगर-शेड्यूल्ड बँकांकडून शेड्यूल्ड बँकांच्या शाखांकडे जातो.

( ६ ) नव्या कायद्यांतून शेड्यूल्ड व बिगर–शेड्यूल्ड बँकांत तफावत करण्याची प्रवृत्ति दिसून येते व सरकारहि त्याच्या ठरावांतून बिगर–शेड्यूल्ड बँकांशीं व्यवहारास मना करतें.

हें सर्व असूनहि, शेड्यूल्ड बँकांप्रमाणेंच बिगर–शेड्यूल्ड बँकांचा व्यवहार व्यापाचा असावा अशी रिझर्व्ह बँकेची अपेक्षा असते. त्यासाठी बिगर–शेड्यूल्ड बँकांना जादा नोकरवर्ग नेमावा लागतो. स्थानिक वृत्तपत्रांत त्यांनाहि वार्षिक ताळेबंद छापावे लागतात. ह्या सर्वांमुळें, बिगर–शेड्यूल्ड बँकांवर खर्चाचें ओझें पडतें; पण त्याची भरपाई मात्र होत नाहीं.

तालुक्यांतून व ग्रामीण भागांतून लहान बँकांची, म्हणजे बिगर-शेड्यूल्ड बँकांची, आवश्यकता आहे असें म्हटलें जातें. परंतु, वर सांगितल्याप्रमाणें, वेगवेगळ्या कायद्यांच्या तरतुदी, सरकारी ऑर्डरी, बड्या फर्म्सचें दुर्लक्ष, ह्यांमुळें बिगर-शेड्यूल्ड बँकांच्या कारभारांत आडकाठी मात्र येते. देशाच्या आर्थिक संसारांत त्यांना योग्य ती कामगिरी करतां यावी, ह्यासाठीं रिझर्व्ह बँकेकडून त्यांना सवलती मिळणें आवश्यक आहे. त्याकरितां रिझर्व्ह बँकेकडे कांहीं डिपॉझिट ठेवण्यास बिगर-शेड्यूल्ड बँकांना सांगितलें, तर त्या त्याला नकार देणार नाहींत.


सारस्वत को-ऑपरेटिव्ह बँक लि.
सारस्वत बँक बिल्डिंग, गिरगांव, मुंबई
शेअर भांडवल व रिझर्व रु. ११,७०,३००
ठेवी .... .... .... रु. १,१८,५८,४००
एकूण खेळतें भांडवल रु. १,३३,११,५००
शाखा:- बँकेचे सर्व व्यवहार केले जातात
दादर
माहीम

शाखा:-
बेळगांव
पुणें
स्थापना १९१८


### मोठ्या बँकांच्या मुख्य अधिकाऱ्यांचे पगार

गुरुवार दि. २३ रोजीं बँक नोकरांनीं संप केला. त्यावेळीं मुंबईमधील बँकांच्या दरवाज्यांत मोठाल्या फलकांवर कित्येक बड्या बँकांच्या व्यवस्थापकांचे पगार संपवाल्यांनीं लिहून ठेवले होते. ते असे:—

| मुख्य अधिकारी | वार्षिक पगार ( रु. ) |
|---|---|
| इंपीरिअल बँक ( ज. मॅ. ) | २,४२,००० |
| बँक ऑफ इंडिया | १,६३,००० |
| सेंट्रल बँक ( मॅ. डा. ) | १,२८,००० |
| युनायटेड कमर्शिअल बँक | ९६,००० |
| बँक ऑफ बरोडा | ७३,००० |
| अलाहाबाद बँक | ६८,००० |
| पंजाब नॅशनल बँक | ५५,००० |
| ग्रिंडलेज बँक | ६८,००० |
| हिंदुस्थान कमर्शिअल बँक ( मॅ. डा. ) | ५३,००० |

रहावयास जागा, मोटार, विमानांतून प्रवास, इत्यादि सोईहि त्यांना मिळतात व त्यांच्या पगारावरील इनकम टॅक्सहि बँका भरतात, असेंहि त्या फलकांवरून समजतें.

### नॅशनल प्लॅन सर्टिफिकिटें

११ सप्टेंबर अखेर एकूण १,६२,८७१ लोकांनीं मिळून नॅशनल प्लॅन सर्टिफिकिटांत २ कोटी, १५ लक्ष रुपये गुंतविले आहेत. नॅशनल प्लॅन लोन बंद करण्यांत आलें असलें तरी सर्टिफिकिटांची विक्री अद्याप चालू आहे. लहान लोकांनाहि सरकारी कर्जास हातभार लावता यावा, ह्यासाठी प्रस्तुत सर्टिफिकिटांची योजना केलेली आहे. कोणत्याहि व्यक्तीस १,००० रु. पर्यंत रक्कम त्यांत गुंतविता येते. जोडनांवानें २,००० रु. गुंतविता येतात. १० वर्षांनीं सर्टिफिकिटांवर ४½% करमाफ व्याज सुटतें. म्हणजे, प्रत्येक १०० रुपयांचे १४५ रु. होतात. गुंतवणुकीनंतर एका वर्षानें केव्हांहि सर्टिफिकिटें मोडतां येतात; व्याज त्या मानानें कमी मिळतें. ७ वर्षे व १२ वर्षे मुदतीचीं नॅशनल सेव्हिंग्ज सर्टिफिकिटें पूर्वीप्रमाणेंच विकलीं जात आहेत. नॅशनल प्लॅन सर्टिफिकिटांची विक्री मात्र कायम स्वरूपाची नाहीं. म्हणून लोकांनीं त्यांत पैसे गुंतविण्याची त्वरा करावी.

### कर्नाटकांतील जोग वीज केंद्रांतून विजेचा पुरवठा

म्हैसूर राज्यांतील जोग वीज पुरवठ्याची वीज ८ ऑक्टोबर रोजीं, दसऱ्याचे मुहूर्तावर, कर्नाटकांतील गांवांना मिळूं लागेल. राणीबेन्नूर, हवेरी व ब्याडगी ह्या गांवांतील विजेचे दिवे जोगच्या विजेनें प्रकाश देऊं लागतील.

## सहकारी बँकांचे अहवाल

( आमचेकडे आलेल्या अहवालांची पोंच येथें दिली आहे. अधिक विस्तृत परामर्ष शक्यतेनुसार अगत्य घेतला जाईल ).

### १ प. खानदेश गव्हर्नमेंट सर्व्हन्टस को. बँक लि.

बँकेचे १२४४ समासद् असून भाग भांडवल ५६,२१५ रु. आहे. खेळतें भांडवल ८,३९,२९७ रु. आहे. ८,३३० रु. नफा. ६½% डिव्हिडंड. ( चेअरमन: उत्तमसिंग अमरसिंग चौधरी. सेक्रेटरी: राजाराम बापुजी रत्नपारखे. )

### २ दि इचलकरंजी अर्बन को. बँक लि.

बँकेचें स्वतःचें भांडवल ( शेअर भांडवल फंड ) २,६०,४८१ रु. चें २,९०,९३७ रु. झालें. खेळतें भांडवल २१,२६,२०० रु. चें २२,२७,३२५ रु. झालें. नफा ३२,३०५ रु. डिव्हिडंड ६¼% ( चेअरमन : यशवंत विठ्ठल दातार. मॅनेजर : डी. आर. काळे. )

### ३ सातारा जिल्हा को. लँड मॉर्गेज लि.

९-२-५४ रोजीं, बँकेचे एक संस्थापक व स्थापनेपासून चेअरमन श्री. आण्णाप्पा नारायण कल्याणी कालवश झाले ! ८१ नवीन सभासदांना १,७१,३५० रुपयांचें कर्ज वाटण्यांत आलें. नफा ३,६९० रु खर्चाचें येणें कर्जाशीं प्रमाण फक्त १·६१% पडत आहे. ( चेअरमन: नी. आ. कल्याणी. मॅनेजर : म. सि. पुटाणी )

### ४ रत्नागिरी अर्बन को. बँक लि.

२,००७ सभासद्, ९४,९४८ रु. शेअर भांडवल, ८०,७२५ रु. रिझर्व्ह फंड, १७,९७,०९५ रु. ठेवी, ८३,१८२ रु. इतर फंड, २४,४७,७८३ रु. खेळतें भांडवल, ६¼% डिव्हिडंड "मुंबई राज्यांतील एक यशस्वी अर्बन बँक"—सर जनार्दन मदन. ( चेअरमन : गजानन बाळकृष्ण चितळे, बी. ए., एलएल. बी. मॅनेजर : विनायक विष्णु भाटवडेकर. )

### ५ जमखंडी अर्बन को. बँक लि.

खेळतें भांडवल १७,५५,८०२ रु. झालें आहे. नफा २६,७११ रु. डिव्हिडंड ५%. सेफ डिपॉझिट व्हॉल्टचें बांधकाम पुरें होत आलें आहे. को-ऑपरेटिव्ह कॉमनवेल्थसंबंधीं इन्स्टिट्यूटनें निबंध मागविले होते, त्यांतील मराठी निबंधांत बँकेचे मॅनेजर श्री. खाडिलकर ह्यांना पहिलें, २०० रु. चें. बक्षीस मिळालें. ( चेअरमन एस्. एम्. अथणी. मॅनेजर : एम्. डी. खाडिलकर, जी. डी. सी. ए. ).

### ६ दि शिरपूर मर्चंटस को. बँक लि.

२०२ सभासद्. ८३,००० रु. शेअर भांडवल. २०,४२० रु. शेअर व इतर भांडवल. २,९९,४५५ रु. ठेवी. २,०२,४६४ रु. कर्जे. ९,२७८ रु. नफा. ६¼% डिव्हिडंड. शेअर भांडवल व ठेवी वाढल्या; सभासदांकडील कर्जे कमी झालीं. ( चेअरमन : छगनलाल मोतीलाल भंडारी. मॅनेजर : मा. ग. ओसवाल ).

### ७ दि लक्ष्मी को. बँक लि., सोलापूर

१२९५ सभासद्. ४३,१५० रु. शेअर भांडवल. ३५,३६८ रु. फंड. १,३९,१६५ रु. खेळतें भांडवल. २,९५,८८० रु. कर्ज येणें. ठेवींत व व्यवहारांत वाढ. रिकरिंग ठेव खातें सुरू केलें आहे. अहवालाचे वर्षी बँकेस २५ वर्षे पुरीं होतात. स्वतःची इमारत बांधण्याचा उपक्रम. ३,८९० रु. नफा. ५% डिव्हिडंड. ( चेअरमन : अनंत कोंडो कुलकर्णी, बी. ए., बी. टी. मॅनेजर : नारायण कोंडो ढंके ).

### ८ दि नगर डि. अर्बन सें. को. बँक लि.

वसूल भांडवल ३,७०,२७० रु. रिझर्व्ह फंड ३,०४,०८९ रु. इतर फंड २,८३,११८ रु. ठेवी ५२६४,१७६ रु. कर्जे ३५,८९,७५३ रु. नफा ४२,२६१ रु. डिव्हिडंड ५%. नगर शहर पाणीपुरवठा कर्जात शहरवासियांच्या हितास्तव १,००००० रु. गुंतवणूक. नव्या सेफ डिपॉझिट व्हॉल्टमुळें सभासदांची सोय. व्यवस्था खर्चात ७,८४२ रु. ची बचत. ( चेअरमन : मो कुं. फिरोदिया, बी. ए, जनरल मॅनेजर : कृ ज. जोशी. मॅनेजर : त्र्यं. वि. निसळ )

### ९ बॉंबे स्टेट को. बँक लि.

एकूण ठेवींत ५७ लक्ष रु. ची घट. खेळतें भांडवल ११,६९,१४,६०५ रु. त्यापैकीं ६०,४७,१०० रु. भाग भांडवल, ८,७१,००० सरकारचें भांडवल, ५७,२१,८५८ रु. रिझर्व्ह व इतर फंड, ८,९८,११,६३९ रु. ठेवी, कर्जे व ओव्हरड्राफ्ट, १,२४,४०,००० रु. सोसायट्या व व्यक्ती ह्यांना मिळून कर्जे ५४९ लक्ष रु. गेल्या वर्षीपेक्षा ४६ लक्षांची वाढ. सात नवीन शाखा उघडल्या. नफ्यांत २·३२ लक्ष रु. ची घट. डिव्हिडंड ४% गेल्या वर्षापेक्षा १% कमी. ( चेअरमन : आर. जी. सरय्या. ऑनररी मॅ. डायरेक्टर : व्ही. पी. वर्दे. मॅनेजर : वाय. बी. गायतोंडे )

### १० दि महाड को. बँक लि.

९७० सभासद्. ८५,६७५ रु. शेअर भांडवल. ४४,१०६ रु. रिझर्व्ह फंड. ६६,२२१ रु. इतर फंड ६,५४,५५३ रु. ठेवी. ८०,३७,००० रु. एकूण व्यवहार. इमारतीसाठी जागेचा ताबा, नकाशे व एस्टिमेट तयार. थकबाकीचें प्रमाण २३% वरून १६% आणलें. ११,०७३ रु. नफा. ५% डिव्हिडंड. ( चेअरमन : द. न. वैद्य, बी. ए., एलएल. बी. ऑ. मॅनेजिंग डायरेक्टर : पि. गो. मेहता, बी. ए., एलएल. बी. मॅनेजर : मा. गो. धारप, बी. एससी. एच. डी. सी. )

### ११ दि मराठा को. के. बँक लि., बेळगांव

१३३२ सभासद्. ५६,७०० रु. शेअर भांडवल. ४१,८८९ रु. रिझर्व्ह व इतर फंड. ४,१५,१३८ रु. ठेवी. ५,३२,३९० रु. खेळतें भांडवल. २,७५,२३० रु. येणें कर्जे. ठेवींत वाढ १०,०६६ रु. नफा ५%. डिव्हिडंड चेक. बिलें-वसुली व रेल्वेरिशिटी स्वीकारणें ह्या व्यवहारांत प्रगति ( चेअरमन : गजानन महादेवराव भातकांडे. सेक्रेटरी : ए. के. सोमणाचें, डी. को-ऑप. )

### १२ अर्बन को. बँक लि., सांगली

२,०७७ सभासद्. १,८८,७८० रु. भांडवल २,१०,८३८ रु. रिझर्व्ह व इतर फंड. २५,६८,३३३ रु. ठेवी. ३५,१५,७५६ रु. दिलेलीं कर्जे. ४,२२,४४० रु. हुंड्या खरेदी. ३५,५१७ रु. नफा. ६¼% डिव्हिडंड. बचतयोजनेंत बरेच सभासद् व नागरिक सामील. व्यवस्थाखर्चाचें खेळत्या भांडवलाशीं प्रमाण १·४% ठेवींत २,८८,५३६ रु. ची वाढ. माधवनगर येथें पे-ऑफिस काढण्याचा उपक्रम. नोकरांचें ग्रुप इन्शुअरन्स करण्यांत येणार. ( चेअरमन : महादेव हरि गोडबोले, बी. ए., एलएल. बी. व्यवस्थापक : लक्ष्मण यशवंत लागू, बी. ए., एलएल. बी. )

### कल्याण पीपल्स को. बँक लि.

"अ" वर्ग सभासद् ७७२, "ब" वर्ग सभासद् ६३८, शेअर-भांडवल ३,१३,७२० रु., फंड ३,१२,७४० रु. ठेवी ९,८४,०८९ रु. खेळतें भांडवल २४,७८,०११ रु. बँकेची सर्व खात्यांत वाढ. शाखांतील ठेवी २,९८,५११ रु. च्या ४,५८,९८४ रु. वर

गेल्या. कल्याण स्टेशन, डोंबिवली व शहापूर शाखा स्वावलंबी. नफा २२,६५६ रु. डिव्हिडंड ४%. (चेअरमन: दौलतराव जयरामराव झुंजारराव. ऑ. मॅनेजिंग डायरेक्टर्स: गं. वा. भिडे व मु. कृ. जोशी. मॅनेजर: बा. बा. रुद्रभटे.)

**१४ वाई अर्बन को. बँक लि.**

९१९ सभासद. ४६,२२५ रु. भागभांडवल. २०,०१७ रु. रिझर्व्ह फंड. ३४,१२५ रु. इतर फंड. ३,४७,१९९ रु. ठेवी. १,९४,३६० मोडवल गुंतवणूक. खर्चाचें प्रमाण २% गृहबचत-योजनेचा ५९ खातेदार फायदा घेतात. सभासद-तरतूद निधीची योजना लवकरच अंमलांत येईल. ८,५९० रु. नफा. (चेअरमन: गणेश व्यंकटेश डवळीकर. ऑ. सेक्रेटरी: रामचंद्र चिंतामण पावगी)

**१५ जनता सहकारी बँक लि.**

३९२ सभासद, ३६,४०० रु. शेअर भांडवल, २,९६,२३५ रु. ठेवी, १,२१,६८७ रु. कर्जे, १६६० रु. नफा, ३% डिव्हिडंड. "बँकेनें दिलेल्या कर्जाची वसुली व्यवस्थित होत आहे. काटकसर-योजनेचा प्रसार होत आहे. वैद्यकीय मदतयोजना चालू वर्षी सुरू होईल. तूर्त तिचें क्षेत्र निर्धन व योग्य स्त्री-सभासदांना प्रसूतीच्या वेळीं कांहीं द्रव्यसाहाय्य कर्जरूपानें देण्यापुरतें मर्यादित राहील." (चेअरमन: डॉ. शं. श्री. नामजोशी, एम्. बी. बी. एस्. मॅनेजिंग डायरेक्टर: श्री. द. शं. जमदग्नि)

**१६ पुणें जिल्हा खरेदी-विक्री संघ, लि.**

संघानें सिमेंट, लोखंड, पेंड, मिश्रखत, बटाटाबियाणें, बटाटा मिश्रखत, सल्फेट, पंपिंग सेटस्, इंजनाचीं तेलें व अवजारें, लेखन-वह्या, उत्तरपत्रिका, इत्यादींचा व्यवहार केला. बटाटाविक्रीसाठीं व मुसारमाल विक्रीकरतां अशीं दोन अडतदुकानें चालविलीं. बटाटा-कर्जाबाबत व्यावहारिक धोरण ठेवलें. नफा १९,९९५ रु. डिव्हिडंड ४% सहकारी व्यापारी वृद्धीस प्रोत्साहनासाठीं संघानें ठेवलेली ढाल सुभाष सामुदायिक सहकारी शेतकी संघ लि. मांजरी बु. (ता. हवेली) ला मिळाली. ४३,२०० रु. वसूल भांडवल, १,४६,०४४ रु. रिझर्व्ह फंड, १६१,९३७ इमारत फंड, खेळतें भांडवल ६,५५,६०४ रु. (चेअरमन: भा. वि. फाटक. मॅनेजर: ना. द. कुलकर्णी)

**१७ दि सोलापूर डि. सें. को. बँक लि.**

२,९१५ व्यक्ती व ५९४ सोसायट्या सभासद पटावर खपलेलें भांडवल ४,४०,०८० रु. मुंबईराज्य सरकारनें घेतलेलें २,००,००० रु. रिझर्व्ह व इतर फंड ५,४८,२०० रु. ठेवींत ३ लाखांची भर आतां ५३ लक्ष रु. खेळतें भांडवल, ६८ लाख रु. कोणत्याहि प्रकारचें बाहेरलि कर्ज नाहीं. ३२६ शेतकी पतपेढ्यांकडे २४½ लाख रु. येणें. वैयक्तिक कर्जें कमी करण्याचें धोरण, तरी २१४ कर्जदार सभासदांकडून ६,१८,२५१ रु. येणें. मैंदर्गी व माढा पे-ऑफिसचें उद्घाटन. मौल्यवान् जिनसा सुरक्षित ठेवण्याच्या सोईत वाढ. बँकिंग व्यवहाराचा नफा ३२,२५१ रु. वाटप-कामाचा नफा २७,३८६ रु. डिव्हिडंड ४% (चेअरमन: गणपतराव धोंडीबा साठे. मॅनेजर: सी. एस्. परांजपे)


दि
प्रेसिडेन्सी इंडस्ट्रियल
बँक लि.
( शिड्यूल्ड बँक )
प्रेसिडेन्सी बँक बिल्डिंग
पुणें २. ( टे. नं. २७६३ )

अधिकृत, विक्रीस काढलेलें
व खपलेलें भांडवल रु. १०,००,०००
जमा झालेलें भांडवल रु. ७,२४,९१०
खेळतें भांडवल रु. ७५,००,०००

मुंबई शाखा:—कॉमनवेल्थ बिल्डिंग, ८२, मेडोज स्ट्रीट, मुंबई १

श्री. ग. रा. साठे, अध्यक्ष. श्री. दा. ग. बापट, उपाध्यक्ष.

बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात.

श्री. गो. धों. जोगळेकर
बी. ए. (ऑ.), बी. कॉम., एलूएल्. बी.,
मॅनेजर.

श्री. सी. टी. चितळे
मॅनेजिंग डायरेक्टर.
टे. नं. २६०७



पुणें जिल्हा सहकारी खरेदी-विक्री संघ लि. १२५ भवानी पेठ, पुणें २.

खालील मालाचा घाऊक व किरकोळीनें व्यवहार केला जातो

* शेतीचीं अवजारें, एंजिन्स व त्यांना लागणारीं तेलें.
* शेतीकरतां व जनावरांकरतां लागणारी पेंड, मिश्रखतें, अ. सल्फेट, पूर्णिमा मिश्रखत, वगैरे सर्व प्रकारचीं खतें.
* सिमला येथील शुद्ध बटाटा बियाणें व त्याकरतां लागणारें मिश्रखत.
* बटाटा, कांदा, लसूण, वगैरे शेतमालाचा अल्प कमिशनवर खरेदी-विक्री व्यवहार.
* गूळ, ज्वारी, बाजरी, तूर, वगैरे शेतमालाची खरेदी-विक्री.
* वैशिष्ट्यपूर्ण सांस्कृतिक सहकारी शालोपयोगी वह्या व उत्तरपत्रिका यांचा माफक दरानें पुरवठा.

फोन नं. ३२१५
तार—SANCOSOP

वरीलकरतां समक्ष भेटा अगर लिहा.

ना. द. कुलकर्णी
मॅनेजर


हें पत्र पुणें, पेठ शिवाजीनगर घ. नं. ११५।१ आर्यभूषण छापखान्यांत केशव गणेश शारंगपाणी यांनीं छापिलें व श्रीपाद वामन काळे, बी. ए. यांनीं 'दुर्गाधिवास', ८२३ शिवाजीनगर ( पो. ऑ. डेक्कन जिमखाना ), पुणें ४ येथें प्रसिद्ध केलें.